Maya CARE Foundation
The next best thing to family

# माया केअर फाऊंडेशन

News Letter

✻ वार्तापत्र ✻

वर्ष : 1 ले ● अंक : 3 रा
एप्रिल – जून 2022
केवळ खाजगी वितरणासाठी विनामूल्य

## संपादकीय ...

आमच्या वार्तापत्राचा तिसरा अंक आम्ही प्रकाशित करीत आहोत. कोविडच्या दोन लाटा येऊन गेल्या. भारत सरकारने अत्यंत आक्रमकपणे लसीकरणाची मोहीम राबविली, तसेच हे लसीकरण मोफत केले. यामुळे आपण या साथीशी यशस्वीपणे मुकाबला करू शकलो. या कोविडच्या साथीचा सर्वात जास्त परिणाम झाला तो ज्येष्ठ नागरिकांवर. वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन यांनी प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीनुसार एकंदर जे लोक मृत्युमुखी पडले त्यातील 95% लोकांचे वय साठ वर्षांपेक्षा जास्त होते.

अशी परिस्थिती असली तरी मायाकेअरने आपल्या सेवेत काही कसूर केली नाही. आवश्यक ती सर्व काळजी घेत आणि शासकीय सर्व निर्बंध पाळून शक्य असेल तेवढी आम्ही मदत देतच होतो. आजपर्यंत आम्ही सुमारे 18,000 वेळा ज्येष्ठ नागरिकांच्या घरी जाऊन त्यांची सेवा केली आहे. आमची अशी इच्छा आहे कि केवळ भारतातच नव्हे  तर जगातील सर्व मोठया शहरात आम्ही सेवा द्यावी. पण ह्या सर्व सेवांना मर्यादा आहेत. पैसे, मनुष्यबळ, भारताबाहेरील देशातील कायदे या सर्व अडचणी आहेत.

या कोविडच्या महामारीमुळे ज्येष्ठ नागरिकांच्या शारीरिक तसेच मानसिक आरोग्यावर खूप मोठा परिणाम झाला. कोविडने बाधित झालेल्या लोकांशी संपर्क येतो काय हि भीती आणि लॉकडाऊन मुळे एकांतवासात **(Quarantine)** राहावे लागत असल्याने त्यांचा अस्वस्थपणा वाढला आणि त्याचा परिणाम एकटेपणा आणि डिप्रेशनची शिकार होण्यात झाला. शिवाय कुटुंबियांकडून किंवा केयरटेकर कडून अवहेलना, मानहानी यासारख्या गोष्टीत वाढ झाली तसेच या महामारीमुळे ज्येष्ठ नागरिकांच्या आर्थिक परिस्थितीवर सुद्धा परिणाम झाला.

एकाकीपणा **(Isolation)** हि जी समस्या वृद्धांमध्ये आहे ती दिवसेंदिवस वाढत आहे, जोडीदार निघून गेलेला असतो आणि वृद्ध एकटे पडतात. कित्येक घरांमध्ये इतर माणसे असली तरी त्या वृद्धांना निर्णयप्रक्रियेत कोणी सामील करून घेत नाहीत आणि त्यांच्याबरोबर कोणी बोलतही नाही. अमेरिकेतील या **NASEM** संस्थेने केलेल्या पाहणीनुसार 65 वर्षांपेक्षा जास्त वयातील एक चतुर्थांश प्रौढांना सामाजिकदृष्ट्या **isolated** मानले जाते कारण त्यांना एकटे राहणे, कुटुंब व मित्र गमावणे, दीर्घ आजार आणि श्रवण शक्ती कमी होणे यासारख्या घटकांचा सामना करावा लागतो आणि मग त्यांना स्मृतिभ्रंश व इतर गंभीर परिस्थितीला तोंड द्यावे लागते. अशा वृद्धांना मदत करण्यासाठी आम्ही फोन मित्र **(Telephone Companionship)** ही नवीन योजना सुरु केली आहे. या योजनेत जगभरातील कोणतेही वृद्ध सामील होऊ शकतात. अट एवढीच आहे कि त्यांचेकडे स्मार्टफोन असला पाहिजे आणि त्यांना इंग्रजी, हिंदी किंवा मराठी यापैकी किमान एक भाषा आली पाहिजे. आमचे एक स्वयंसेवक श्री कायंदे यांचा यासंबंधीचा एक अनुभव आम्ही या अंकात प्रसिद्ध केला आहे. आपल्या कुटुंबीयांपैकी किंवा परिचितांपैकी कोणा ज्येष्ठ नागरिकांना या सेवेचा लाभ घ्यावयाचा असेल तर त्यासाठी संपर्क साधा **+918830194967** या नंबरवर.

# आमची बिंदू टीम ....




मायाकेअर फौंडेशन वृद्धांची सेवा करण्यासाठी काम करतेच पण त्याचबरोबर दिव्यांग व्यक्तींचे सक्षमीकरण करण्याच्या उद्देशाने सुद्धा काम करते .दिव्यांग व्यक्तींचे सक्षमीकरण ही एक दीर्घकालीन प्रक्रिया आहे. त्या दृष्टीने अशा दिव्यांग व्यक्तींसाठी मायाकेअर फौंडेशनने प्रोजेक्ट बिंदू (बिंदू याचा संस्कृत मध्ये अर्थ आहे लक्ष केंद्रित करणे )या नावाने एक प्रकल्प राबविण्यास सुरुवात केली आहे ज्यायोगे या दिव्यांग व्यक्तीना विकासासाठी संधी प्रदान करता येईल आणि ते दिव्यांग , सुरक्षित आणि सन्माननीय जीवन जगू शकतील.

बिंदू टीम मध्ये तीन स्वतंत्र भाग आहेत एक व्हॉइस टीम (दृष्टिहीन दिव्यांगांसाठी ) दुसरी डाटा टीम (कर्णबधिर दिव्यांगासाठी ) आणि तिसरी पॉवर टीम (लोकोमोटोर असलेल्या /सेरेब्रल पाल्सी /पोलिओ यांनी बाधित असलेले दिव्यांग) या सर्व टीम मध्ये मिळून 100 दिव्यांग काम करतात.

या अंकातील एका लेखात चैतन्य कायंदे याचा अनुभव दिलेला आहे तो दृष्टिहीन असून आमच्या बिंदू टीमच्या व्हॉइस टीमचा सभासद आहे आणि त्याचे श्री देशपांडे आजोबा यांचेबरोबरचे संभाषण हा आमच्या (**Voice Companionship programme** ) चा एक भाग आहे .

तसेच वर दिलेला जो फोटो आहे तो श्री निलेश बोर्डे याचा आहे आणि तो आमच्या पॉवर टीमचा सभासद आहे आणि त्याने **SVP INDIA FAST PITCH** ची ट्रॉफी जिंकलेली आहे.

## ज्येष्ठांसाठी हेल्पलाईन

★ प्रोजेक्ट मुंबई – **9879508404** ★ सिल्व्हर इनिंग्ज – **9029000091**

★ हेल्पेज इंडिया – **18001801253** ★ आदित्य प्रतिष्ठान – **9004782919/8291087192**

★ पुणे पोलिस ज्येष्ठांसाठी – **1090**

आजीची माया असतेच अशी, तूप, रोटी, साखर खावी जशी !

# माया केअर वृत्त

**1.** दिनांक 12 मार्च 2022 रोजी माया केअर तसेच एम. आय. टी आणि व्हि आय टी या पुण्यातील प्रथितयश महाविद्यालयातील माहिती तंत्रज्ञान विभागातील विद्यार्थी आणि प्राध्यापक यांचे बरोबर कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग पुणे येथे माया केअर संचालिका सौ. मंजिरी गोखले जोशी यांनी संवाद साधून विचार मंथन केले. Artificial Intelligence आणि Data Science या तंत्रज्ञानाचा वापर करून माया केअर मधील दिव्यांग कर्मचाऱ्यांचे काम अधिकाधिक सुलभ कसे करता येईल याबद्दल कार्यशाळा झाली. या प्रकल्पाला लवकरच सुरुवात होईल. नुकत्याच पार पडलेल्या जागतिक महिला दिनानिमित्त आमच्या काही दिव्यांग महिला कर्मचाऱ्यांनी आपल्या कामाची येथे माहिती दिली.

**2.** आम्हाला कळवण्यास अत्यंत आनंद होतो की सामाजिक संस्थांच्या एस व्ही पी इंडिया फास्ट पीच या दूरदृश्य प्रणाली द्वारे दिनांक 4 फेब्रुवारी 2022 रोजी झालेल्या स्पर्धेत माया केअर ला द्वितीय पारितोषिक मिळाले.या स्पर्धेत आमचे बिंदू टीम चे लीडर श्री निलेश बोर्डे यांनी माया केअर च्या सामाजिक कार्याची माहिती देऊन सर्व प्रेक्षकांची आणि परीक्षकांची मने जिंकली.

**3.** हडपसर येथे समर्थनम ट्रस्ट या संस्थेमार्फत घेतलेल्या दिव्यांग रोजगार मेळाव्यात माया केअर तर्फे 27 युवक युवतींना रोजगार मिळवून देण्यात आला. यावेळी माया केअरला स्मृतिचिन्ह प्रदान करण्यात आले.

**4.** निवारा वृद्धाश्रम पुणे येथे महिला कर्मचाऱ्यांसोबत जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. यावेळी निवारा मधील प्रमुख परिचारिका श्रीमती आडकर यांना गुलाबपुष्प व धार्मिक पुस्तक भेट देण्यात आले.

**5.** खराडी येथील वृद्धाश्रमामध्ये माया केअर चे एक लाभार्थी प्रा. सुधाकर कुलकर्णी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी एक संगीत रजनी चा एक कार्यक्रम सादर केला . त्यात मराठी व हिन्दी गीते सादर करण्यात आली . या कार्यक्रमाचे निवेदन माया केअर चे एक स्वयंसेवक विद्याधर जोशी यांनी केले. तसेंच माया केअर चे दुसरे स्वयं सेवक महेश कुलकर्णी यांनी कार्यक्रमाची तांत्रिक बाजू सांभाळली. उपस्थित सुमारे 100 वृद्धांनी त्याचा मनमुराद आनंद घेतला.

# इंग्लंडचे आजोबा



चैतन्य कायंदे ..बिंदू voice companionship टीम याचा अनुभव:

माया केअर तर्फे मला एका आजोबांशी बोलण्याचे काम मिळाले होते. हे आजोबा बरीच वर्षे इंग्लंडमध्ये राहात होते. त्यांच्या पत्नीचे 2 वर्षांपूर्वी दुःखद निधन झाल्याने तिकडे त्यांना एकटेपणा जाणवत होता. त्यांचे वय 87 वर्षे आहे.

ते भारतामध्ये पूर्वी बरीच वर्षे राहिल्या मुळे त्यांना मराठी भाषा अवगत होतीच. त्यांच्या बरोबर त्यांच्या वेळेनुसार नित्यनियमाने मी बोलायला सुरुवात केली ज्यामुळे त्यांना छान विरंगुळा मिळत होता. करोना काळामध्ये ते मला इंग्लंडमधील व मी त्यांना भारतातील घडामोडी सांगत होतो. मला जेंव्हा कळाले की ते वैमानिक होते व खूप देशांमध्ये त्यांचे जाणे झाले आहे त्यानंतर मला खूप वेगवेगळे अनुभव ऐकायला मिळाले.

ते उत्तम चित्रकार सुद्धा आहेत व मला त्यांनी व्हाट्सऍप वरून कोणार्क सुर्यमंदिर व इतर पुरातन मंदिरांची चित्रे पाठवली. मी त्यांना माझ्या लोणार सरोवर भेटीची माहिती सांगीतल्यावर कधी भारतात येऊन तिथे जातो असे त्यांना झाले होते. आणि आजोबा त्यांच्या मुलाबरोबर इंग्लंड ते नागपूर व पुढे लोणार ला आले. त्यांची राहण्याची, उत्तम महाराष्टीयन जेवणाची व्यवस्था केली व संपूर्ण लोणार दाखवले. त्यांना खूपच आनंद झाला होता. तसेच मी त्यांना माझे घरी पण नेले व त्यांचे उत्तम आदरातिथ्य केले ज्याने ते भारावून गेले. माझ्या वाढदिवसाला त्यांनी इंग्लंडहून शुभेच्छा दिल्या होत्या व मी तूला काहीतरी भेट देणार असे म्हणाले होते.भारतात भेट झाल्यावर त्यांनी मला चक्क iPhone भेट म्हणून दिला ज्यावर माझा विश्वासच बसत नव्हता. एवढी मोठी भेट मला कधीच मिळाली नव्हती. अशा प्रकारे माया केअर मूळे माझे व आजोबांमधील 8000 किलोमीटर अंतर इतक्या लवकर कमी झाले व आमची प्रत्यक्ष भेट सुद्धा झाली.

# लाभार्थ्यांच्या प्रतिक्रिया

77 वर्षाच्या लिमये आजींना पैशाची चणचण भासत होती. शक्यतो मुलांकडे मागण्याची त्यांची इच्छा नसते. त्यांच्या यजमानांनी घेतलेली सोन्याच्या काही वेढणी त्यांच्याकडे होती, पण पावत्या नव्हत्या. करोना काळातला हा प्रसंग... पाऊस मुसळधार पडत असल्याने आणि करोनाच्या संसर्गाची भीती असल्याने त्या स्वतः सोने मोडण्यासाठी पु ना गाडगीळ ज्वेलर्स यांचेकडे जाऊ शकत नव्हत्या. त्या वेळी त्यांना मायाकेअरची आठवण झाली, त्यांनी फोन केला. मी त्यांच्या वतीने पीएनजी कडे गेलो परंतु ते पावती शिवाय सोने घ्यायला तयार नव्हते. त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी बोलून परिस्थितीची कल्पना दिल्यावर त्यांनी यावर उपाय काढला. आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यावर त्या सोन्याबद्दलच्या रकमेचा चेक त्यांना मिळाला, तो त्यांच्या खात्यामध्ये जमा केला. याआधी आपल्याजवळ असलेल्या सोन्याचे काही करता येईल ही आशाच सोडली होती. पण जेव्हा त्यांच्या खात्यात ही रक्कम जमा झाली तेव्हा त्यांची प्रतिक्रिया अशी होती....
चेक जमा झाला आहे, खूप खूप धन्यवाद ! वैभव, ही सगळी तू आणि तुझीच माया आहे !
– निशा लिमये, 8766504831, भांडारकर रोड, पुणे. स्वयंसेवक **वैभव रांजणगांवकर** यांच्याबद्दल प्रतिक्रिया
******
मी सौ आदिती अविनाश देशपांडे. माझी आई श्रीमती शैलजा शंकर इनामदार निवारा वृद्धाश्रम येथे गेले वर्षभर राहत आहे .मला तेथील अधिकारी श्री मराठे सर यांनी माया केअर सेंटरची माहिती दिली. **श्रीमती विनिता महाजन** यांनी आईला मार्गदर्शन केले. तिला चालायला येत नसल्याने ती देवाला नावे ठेवत होती. पण महाजन मॅडम मुळे तिने जप करायला परत सुरुवात केली. अजून एक महत्वाची गोष्ट म्हणजे तिला थोडा आत्मविश्वास आला. त्यामुळे मी महाजन मॅडम आणि माया केअर सेंटरची खूप आभारी आहे.
आदिती देशपांडे, 9890813569 लोकमान्यनगर, पुणे
*******
(ज्येष्ठ महिला लाभार्थी लता ढेरे यांच्या आवाजातील ध्वनिमुद्रण )
नमस्कार, मी लता ढेरे बोलत आहे. माया केअर संस्थेचं काम मला खूप आवडलं. आमच्याकडे **सौ वीणा जोग** येतात. आमचा वेळ छान जातो. आम्ही गप्पा मारतो.त्या केव्हा येतात याची मी वाट पाहत असते. त्यांच्यामुळे एकटेपणा अजिबात जाणवत नाही. तुमच्या संस्थेचं काम मला खूप आवडलं. धन्यवाद.
लता ढेरे – 9741581636, न्यू डी पी रोड, कोथरूड, पुणे

Maya care Foundation provides help and support to senior citizens in various countries across the world. During the lockdown, Maya care has been a lifesaver for me and my parents. I live in the UK and my parents reside in Pune. Being the only child I was constantly worried about my parents well-being and the Covid pandemic made it even more difficult. My mother was suffering from dementia and my eighty nine year old father who had been physically active prior to the pandemic found it very difficult to cope with the lockdown and my mother's illness during the pandemic. It was at this time that I reached out to the Maya care coordinator Nilesh for help. Nilesh was very helpful and organized a volunteer within no time. **Shri Vidyadhar Joshi** (I call him Joshi kaka, rightfully so ) who volunteers for Maya care has been a godsend for me in this difficult time. He has been helping my father with investments, taking him on doctor visits, getting medicines and giving baba reassurance and support like a loving family member. He is always ready to help with a smile (sometimes even at short notice) and baba has found a good trusting friend in him. When Aai passed away in January this year Joshi kaka was at Baba's side that evening. It was an extremely difficult and stressful situation and I couldn't have managed without the aid that Maya care gave me unfailingly during these difficult times. I am extremely grateful for all the help and support Maya care has given me and my family and would urge everyone to support this initiative in the noble service they provide to the community.
**Sangeeta Bhalerao, +447415863730, U.K.**

# हर्षदा

नमस्कार मी मकरंद निमोणकर. माया केअर फाऊंडेशन तर्फे मी ज्येष्ठ नागरिकांना निःशुल्क सेवा देतो. श्री. कानडे यांच्याकडे मी त्यांना सेवा देण्यासाठी गेली पाच वर्षे जात आहे. त्यांच्याकडे हर्षदा या त्यांच्या केअरटेकरशी माझी ओळख झाली.कानडे जेव्हा घरात पडले तेव्हा हर्षदा त्यांच्याकडे कामाला लागली. तिच्याबद्दल कानडे यांनी मला सांगितलं तेव्हा लक्षात आलं की ही किरकोळ शरीरयष्टीची कोकणात जन्मलेली वाढलेली काटक स्त्री शिक्षणापासून बरीच लांब आहे. पदरात लहान मुलं आहेत. व्यसनामुळे आयुष्याचा जोडीदार निघून गेला आहे. त्यावेळी मला वाटलं हिला मदत करावी.

गॅसच्या कार्डावर वापरकर्ता म्हणून तिच्या नव–याच.नाव काढून तिथे हर्षदाचं नाव घातलं. तिचं आधार कार्ड काढून दिलं. आधार कार्ड काढल्यामुळे तिला कोरोनाची लस घेता आली.एका पेशंटची सेवा करत असल्याने कोवीडची लस घेणं तिला आवश्यक होतं.मी पुण्याच्या सेवासदन शाळेत तिचा प्रवेश घेतला. तिला पैशाची बचत, बँकेचं आपल्या आयुष्यातील महत्व हे समजावून सांगणं खूप सोपं झालं.तिच्या आणि तिच्या मुलांच्या नावाने बँकेत खातं उघडलं.

तिने बँकेत एफडी केली.पुण्यात आली तेव्हा पैशाची चणचण असणारी हर्षदा काही पैसे बचत करून मुलांच्या भविष्याची स्वप्न बघण्याची हिम्मत करू शकली.त्यानंतर तिच्या ई–श्रम कार्डाची पूर्तता केली व त्याचे फायदे सांगितले. मेरिलीन डायर यांनी मदत केल्याने तिला नव–याने घेतलेलं कर्ज फेडता येणं शक्य झालं आहे.आता शिक्षणाचं महत्त्व तिला पटलं आहे. पूर्वीसारखं आपण फसवल्या जाणार नाही याचा आत्मविश्वास तिला आला.शाळेमुळे तिला वेगवेगळ्या विषयांची माहिति मिळू लागली. मीही तिला अनेक सरकारी योजनांची वेळोवेळी माहिती देत असतो.

हर्षदा आता कानडे आणि आपल्या मुलांचं सगळं आवरून शाळेत जाते.आमचे डॉ. मित्र श्री .कुंभारे यांच्याकडून हर्षदा चे डोळे तपासून चष्मा घेऊन दिला. डॉक्टरही अशा व्यक्तींसाठी निःशुल्क सेवा देतात.तिच्या हातात साक्षात अन्नपूर्णा वास करत आहे त्यामुळे ती यासंबंधीचा व्यवसाय करू शकते हे मी तिच्या लक्षात आणून दिलं.

स्वतःमध्ये सकारात्मक बदल घडवून आपलं आयुष्य सोन्याचं करायचं की आहे त्या परीस्थितीत कुजत पडायचं हा प्रत्येक व्यक्तीचा वैय्यक्तिक प्रश्न आहे. एक सेवाव्रती म्हणून या सकारात्मक विचारांची सेवा मी हर्षदाला दिली. तिला स्वत:ला सगळ्या गोष्टी पटल्या म्हणून तिने शिक्षणाची कास धरली.

हर्षदाच्या स्वप्नांना आता आकाशही बांधून ठेऊ शकणार नाही. तिला आत्मविश्वासाने पुढे जाताना बघून एक सेवाव्रती म्हणून मला आनंद होत आहे. हर्षदाला पुढच्या वाटचालीसाठी खूप शुभेच्छा.

श्री.मकरंद निमोणकर स्वयंसेवक माया केअर पुणे.

# एक सुखद मनोमिलन

खालील अनुभव नावे बदलून लिहिला आहे.

नमस्कार. मी अविनाश कुलकर्णी पुणे येथे राहत असून मी गेली 4 वर्षे माया केअर मध्ये ज्येष्ठांना सेवा देत आहे.मी गेले 3 वर्षे निवारा वृध्दाश्रम नवी पेठ पुणे येथे ज्येष्ठ नागरिकांच्या सेवे साठी जात आहे.

सदर सेवा करताना माझी श्री मनोज सांगलीकर आजोबा यांचेशी ओळख झाली.मी गेले 6 महिने त्यांची सेवा करीत आहे.बोलता बोलता त्यांनी मला सांगितले की त्यांची भाची सौ भारती गुप्ते कर्वेनगर येथे राहते. काही किरकोळ भांडणामुळे व गैरसमजुतीमुळे त्यांची भाची त्यांचेशी 1 वर्ष बोलत नव्हती व निवारा मध्ये त्यांना भेटायला आली नव्हती. त्यांना तिची माफी मागायची होती पण त्यांची हिंमत होत नव्हती.त्यांनी एक माफीनामा लिहिला आणि मला अशी विनंती केली की त्यांचा माफीनामा मी तिला नेवून द्यावा आणि तिची समजूत काढावी. मी सदर माफीनामा घेवून कर्वेनगर ला गेलो व भाची बरोबर चर्चा केली. काही गोष्टी समजावून सांगितल्यावर भाचीचा राग दुर झाला व ती लगेच इतर नातेवाइकांसह निवारा येथे गेली व तिने सांगलीकर आजोबांची भेट घेतली व दोघांचे सर्व गैरसमज दुर झाले व आता ते कायम भेटतात.

दोन दुभंगलेली मने माझ्यामुळे जवळ आली असे सांगलीकर आजोबा कायम म्हणतात व त्याचा मला अभिमान आहे. माया केअर तर्फे अशी संधी मिळाल्या बद्दल मी माया केअर चे मनापासून आभार मानतो.



आमचे स्वयंसेवक श्री अविनाश कुलकर्णी श्री अभय सोमण यांना त्यांच्या पुणे येथील घरी आजारपणात मानसिक आधार देताना.



आमच्या स्वयंसेविका सौ स्नेहल खिंवसरा पुणे येथे अंध ज्येष्ठ महिला श्रीमती सुनंदा फिरके यांना वाचन करून दाखवत असताना.



आमच्या पुण्याच्या स्वयंसेविका सोनाली देवगिरीकर औंध येथे एका आजी आजोबांना पासपोर्ट रीन्युअल साठी मदत करत असताना



ज्येष्ठ मराठी अभिनेते श्री दिलीप प्रभावळकर यांना आमचे स्वयंसेवक श्री मकरंद निमोणकर माया केयर संस्थेची माहिती देताना.



आमचे स्वयंसेवक श्री सोमनाथ बरकडे ज्येष्ठ नागरिक श्री असित कुमार विश्वास यांना त्यांच्या हांडेवाडी पुणे येथील घरी भेटून धीर देताना




वृद्ध भिक्षेकरी यांना मोफत उपचार आणि त्यांचे पुनर्वसन करणाऱ्या सोहम ट्रस्ट या सेवाभावी संस्थेला माया केअर तर्फे ११०० मास्क चे मोफत वाटप करण्यात आले.




नाशिकचे स्वयंसेवक श्री हेमंत चिंचोरे, श्री शंकर अहिरे काकांना हॉस्पिटलचे कामासाठी मदत करीत असताना.



नाशिक मधील स्वयंसेविका अंजली गाडे, पिसोळकर आजी यांना सोबत करून त्यांचे मनोधैर्य वाढवताना.



मुंबईचे स्वयंसेवक श्री देवेंद्र , श्री शेखर दास आजोबांना
मोबाईल वापराबाबत मार्गदर्शन करताना.



अमरावतीच्या स्वयंसेविका अपर्णा मंडळकर श्री राजेश राऊत
यांना बागकामासाठी मदत करताना.



आमचे परभणी येथील स्वयंसेवक रईस शेख , श्री शेख नवाब
यांना हॉस्पिटलचे कामासाठी मदत करताना.



बुलढाणा येथील संत गाडगे बाबा वृद्धाश्रमात आमच्या समन्वयक शुभांगी खराटे
यांचा वाढदिवस साजरा झाला. शेजारी स्वयंसेवक विलास आंबोलकर.



नंदुरबार येथे स्वयंसेवक श्री विशाल ठाकरे श्री काळाराम
ठाकरे यांना आधार कार्ड काढण्यासाठी मदत करताना.




अकोला येथे स्वयंसेवक हरी तुरके , मीराबाई
आजींना पुस्तक वाचून दाखवताना.



कोल्हापूर येथे स्वयंसेवक अजय बिरादार, बाळासाहेब
विटेकर यांना घरगुती साहित्य आणून द्यायला मदत करताना.



सांगली येथे स्वयंसेवक श्री राहुल नवले, श्री गोविंद कदम
यांना बँकेच्या कामासाठी मदत करीत असताना

**Maya** CARE Foundation

The next best thing to family

भावनिक/बौद्धिक /औपचारिक समर्थनासाठी वरिष्ठ नागरिकांना मोफत 90 मिनीटांच्या भेटी

✻ **सेवा** ✻

त्यांना डॉक्टर / रेडियोथेरेपी / लसीकरण / सामाजिक कार्यक्रम थिएटर / बँक / कागदपत्रे / लेखन / वाचन / खरेदी / गॅझेटस वापरुन / व्हिडिओ कॉल करण्यात मदत करा

## MAYA CARE FOUNDATION (INDIA) HELPLINE NUMBERS

| CITY | HELPLINE NO. |
|---|---|
| Pune, Mumbai, Kolhapur, Nagpur, Nasik, Sangli, Solapur, Ahmednagar, Nandurbar, Aurangabad, Buldhana, Akola, Jalgaon, Amravati, Bhopal, Jodhpur, Halkhandi, Guwahati, Jalandhar, Udaipur | 9552510400<br>9552510411<br>9623571845 |

**Website - www.mayacare.org | Email : service@mayacare.org**

Merchant Name : **MAYA CARE FOUNDATION**
Mobile Number : **7721053535**

✻ आपले अभिप्राय व सुचना यांचे स्वागत आहे. आपण ई–मेल करुन कळवू शकता.

**देणगीसाठी आयकर सवलत आहे.**

**NAME OF THE A/C - MAYA CARE FOUNDATION**

**NAME OF THE BANK : ICICI BANK LIMITED** (BRANCH : TILAK ROAD,PUNE)
**ACCOUNT NO. : 187501000462**
**IFSC CODE : ICIC0001875**

**PRINTED MATTER**

बुक–पोस्ट

**FROM,**

**माया केअर फाऊंडेशन**
1214 शुक्रवार पेठ, आफ्रिका हाऊस,
सुभाषनगर, गल्ली नं.04, पुणे – 411002.

केवळ खाजगी वितरणासाठी / विनामूल्य

**TO,**

श्री/श्रीमती ____________________